# जिल्हा रुग्णालय, हिंगोली.

अकोला रोड, रिसाला बाजार, हिंगोली.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☎- कार्यालय- (०२४५६) २२३०८६, २२४११७
☎-निवास-(०२४५६) २२३०८७

फॅक्स नं.(०२४५६) २२०२५३
ई-मेल - cshingoli123@gmail.com

NATIONAL RURAL HEALTH MISSION


जा.क्र.सारुहिं/एनएचएम./ 1306 /२०२०
दि. 21 / 1 /२०२०

प्रति,

.........................

.........................

विषय : दरपत्रक (Quotation) सादर करणे बाबत.......

संदर्भ : मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली यांची मान्य टिप्पणी दिनांक ०५/१२/२०१९

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, जिल्हा रुग्णालय हिंगोली येथील परिचारीका प्रशिक्षण केंद्र, हिंगोली (नर्सिंग स्कुल) करिता Multimedia Projector खरेदी करावयाची आहे.

तरी खालील यादीमध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रती ०१ नग याप्रमाणे आपले दरपत्रक या कार्यालयास ०७ दिवसाच्या आत सादर करावे.

| Sr. No. | Items | Quantity |
|---|---|---|
| 1 | Sony VPL-EW575 Multimedia Projector (Sony) (Sony VPL-EW575) | 01 |

अटी व शर्ती –

१) पुरवठाधारकाने दरपत्रक फर्मच्या लेटरहेडवर नमुद केलेल्या मुदतीच्या आत सीलबंद लिफाफ्यावर "(नर्सिंग स्कुल) करिता Multimedia Projector चे दरपत्रक" असे नमुद करुन सादर करणे बंधनकारक राहील.

२) साहित्याच्या नमुद किंमतीमध्ये सर्व प्रकारचे दर समाविष्ट असावे.

३) साहित्याची देयके पुरवठाधारकास तीन प्रतीत देणे बंधनकारक राहिल.

४) सदर बाबीकरिता कुठलाही अग्रीम मिळणार नाही.

५) सुचनेप्रमाणे साहित्याचा पुरवठा वेळेत, मुदतीत न केल्यास दरकरार रद्द होईल.

६) देयकाची अदायगी साहित्याचा पुरवठा झाल्यानंतरच व साहित्याची शहानिशा करुनच उपलब्ध अनुदानाच्या अधिन राहून पीएफएमएस प्रणालीव्दारे कार्यक्रमाच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येईल.

७) साहित्याच्या पुरवठ्याच्या वेळी वाहतुकीदरम्यान काही नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकाची राहिल.

८) पुरवठाधारकास जिल्हा रुग्णालय हिंगोली येथील "परिचारिका प्रशिक्षण केंद्र" इमारतीमध्ये साहित्याचा पुरवठा करावा लागेल. त्यासाठी वाहतुक व मजूरी साठी लागणारा खर्च पुरवठा धारकास स्वतः करावा लागेल.

Scanned by CamScanner

९) पुरवठा आदेश दिल्या नंतर साहित्याचा पुरवठा करणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

१०) दरपत्रकाबाबत सर्व हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहे.

रद्द करण्याचे

जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय, हिंगोली.

प्रत : मा.जिल्हा माहिती अधिकारी, एन.आय.सी.विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना देवून विनंती करण्यात येते की, सदरील पत्र आपल्या जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

Scanned by CamScanner